मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.६५/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१५२/२०१०
सागर खर्चे –वि.– पुरुषोत्तम खर्चे
**निशाणी क्र.१०२**

## अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक ३ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नाव– डॉ. रविंद्र उत्तमराव राठोड,
वय– ४३ वर्ष, व्यवसाय– वैद्यकीय अधिकारी,
जिल्हा रुग्णालय, बुलढाणा.

**सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. के.व्ही.परमार यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

१. मी नोव्हेंबर २०१७ पासुन मी जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन काम पाहत आहे. सागर राजेश खर्चे यांना मी व्यक्तीगत ओळखत नाही परंतु मेडीकल बोर्डासमोर जे व्यंगत्वाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी लोक येतात त्यापैकी तो एक आहे. मी अपंगत्वाचे प्रमाणपत्र पाहुन सांगतो की १०/०२/२०२० रोजी सागर राजेश खर्चे यांना बोर्डासमोर तपासण्यात आले होते. त्याचे उजव्या पाय गुडघ्याच्या वरपासुन अंगच्छेदीत करण्यात आला होता. केंद्रशासनाच्या युडीआयडी गाईडलाईननुसार जर गुडघ्याच्या वर १/३ भागापर्यंत अंगविच्छेद करण्यात आला असेल तर त्याचे कायमचे व्यंगत्व ८० टक्के समजण्यात येते. पुर्वीप्रमाणे तो व्यक्ती अंगविच्छेद केल्यानंतर काम करु शकणार नाही. कृत्रीम पाय बसवूनही पुर्वीप्रमाणे १०० टक्के काम करणे शक्य नाही. हे खरे नाही की, पुढील काळामध्ये अंगविच्छेद झालेल्या पायास गँगरीन होवू शकते. सागर राजेश खर्चे यास देण्यात आलेल्या व्यंगत्व प्रमाणपत्र दाखवल्यास मी ओळखू शकतो. त्याची प्रत मी सोबत आणलेली आहे. त्यावर बोर्डाचे तीनही मेंबर म्हणजे वैद्यकीय अधिकारी, अस्थिरोग तज्ज्ञ, अतिरिक्त

जिल्हा शल्य चिकीत्सक व जिल्हा शल्य चिकीत्सक यांच्या सहया आहेत. त्या सहया मी ओळखतो. त्या प्रमाणपत्रातील मजकुर बरोबर आहे. ते प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत **निशाणी क्र.१०३** वर आहे. आज रोजी साक्ष देण्यासाठी माझी नियुक्ती आमच्या जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी केलेली असुन साक्षसमन्स त्यांना प्राप्त झालेले आहे. जिल्हा शल्य चिकीत्सक यांचा आदेश **निशाणी क्र.१०४** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास– गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.पाटील यांचेमार्फत सुरु...**

२. दिनांक १०/०२/२०२० रोजी सागर राजेश खर्चे यांना मेडीकल बोर्डासमोर तपासले होते याबाबत ओपीडी पेपर आजरोजी मी सोबत आणलेले नाही. केंद्र शासनाने युडीआयडी गाइडलान्स सोबत आणलेले नाही पण त्या माझ्या मोबाईलमध्ये आहेत. व्यंगत्व कोणत्या कारणाने झाले एवढे फक्त विचारले जाते इतर हिस्टरी लिहीली जात नाही. रोटाव्हेटर मध्ये पाय गेल्याने अंगविच्छेद झाला होता का ते आता मला आठवत नाही. कृत्रीम पायाच्या सहाय्याने तशी व्यक्ती चालु शकते. नियमीत कामे तशी व्यक्ती कृत्रीम पाय बसवल्याने करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, ८० टक्के व्यंगत्वाचे प्रमाणपत्र चुकीचे दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.07.19 17:12:50 +0530

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

दिनांक : १९/०७/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन पाहीले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.07.19 17:12:55 +0530

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

दिनांक : १९/०७/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.